



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १०८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०१ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# महाराष्ट्रासह पुण्यात थंडीचा कडाका वाढला, तापमान ९.८ अंश सेल्सिअसवर

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.३०, पुणे :** आठवडाभरात वाढलेल्या तापमानात सलग दुसऱ्या दिवशी घट होऊन पुण्यात दिवसभरात कमाल २७.९ आणि किमान ९.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. शहरात शनिवारी रात्रीपासूनच वाढत गेलेला गारवा पहाटेपर्यंत कायम राहिल्याने पुणेकरांची रविवारची सकाळी निवांत झाली. सुट्टी असल्याने आल्हाददायक गारठ्यामध्ये वाफाळणारा चहा घेऊन पुणेकर थंडीची मजा घेत असताना दिसून आले. महिनाभरात दुसऱ्यांदा तापमानाचा पारा १० अंशाच्या खाली घसरला आहे.

उत्तरेकडून महाराष्ट्राच्या दिशेने येणाऱ्या थंड वाऱ्यांना अनुकूल वातावरण असल्याने पुण्यासह मध्य महाराष्ट्रात गेल्या दोन दिवसात हवेतील गारवा वाढल्याचं पाहायला मिळत आहे. रविवारी (३० नोव्हेंबर) किमान तापमानात पाच अंशाने घट नोंदविण्यात आली आहे. पहाटे कडाक्याची थंडी होती, शिवाय सकाळी ९ वाजेपर्यंत रस्त्यावर फिरताना हवेत गारवा जाणवत होता. गेल्या दोन दिवसांच्या तुलनेत दुपारी उन्हाची तीव्रताही कमी होती आणि संध्याकाळनंतर गार वारा सुटल्याने बोचऱ्या थंडीचा अनुभव पुणेकरांनी घेतला. सुट्टी असल्याने संध्याकाळनंतर खरेदीसाठी बाहेर पडलेले पुणेकर स्वेटर, मफलर घालून फिरताना दिसून आले. उपनगरांमध्येही मध्यवर्ती पुण्यापेक्षा जास्त



गारठा जाणवत होता.

मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातही पारा घसरला दरम्यान, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातही तापमानात लक्षणीय घट नोंदविण्यात आली आहे. पुणेकरांचे लाडके हिल स्टेशन असलेल्या महाबळेश्वरमध्ये कमाल २५.१ आणि किमान ११.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. राज्यातील उच्चांकी ३४ अंश सेल्सिअस रत्नागिरी तर नीचांकी तापमान ९ अंश सेल्सिअस जळगावमध्ये नोंदविण्यात आले. पुढील दोन दिवस आकाश निरभ्र असेल, तसेच तापमानातील घट कायम राहणार असल्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे पुणेकरांना कडाक्याच्या थंडीची मजा अनुभवता येणार आहे.

### शहराच्या वेगवेगळ्या भागातील तापमान काय?

नोंदवलेले तापमान (अंश सेल्सिअस)

| | |
|---|---|
| गिरीवन - | १५.३ |
| आंबेगाव - | १०.७ |
| तळेगाव - | १०.१ |
| शिवाजीनगर - | ९.८ |
| बारामती - | ९.६ |
| पाषाण - | ९.४ |
| हवेली - | ७.८ |

## पुण्यातील विवाहबाह्य लव्ह स्टोरीचा अंत



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.३०, पुणे :** धाराशिव इथं एका विवाहित प्रेयसीची हत्या करून मृतदेह जाळल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अनिकेत महादेव कांबळे (वय ३३) याने राणी गायकवाड (वय २६) हिचा गळा दाबून खून केला आणि पुरावा नष्ट करण्यासाठी पेट्रोल टाकून मृतदेह जाळण्याचा प्रयत्न केला. राणी सतत अनिकेतसोबत राहण्याचा आणि लग्न करण्याचा आग्रह धरत असल्याने कंटाळून त्याने हा प्लॅन आखला असल्याचे समजते. वाकड पोलिसांनी अनिकेतला अटक केली असून त्याच्यावर खुनाचा व पुरावा नष्ट करण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २६ नोव्हेंबर रोजी राणी घरातून बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या कुटुंबीयांनी वाकड पोलिसांत दिली होती. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण केले असता, राणी सतत अनिकेतच्या संपर्कात असल्याचं आढळून आलं. या माहितीच्या आधारे पोलिसांनी अनिकेतला चौकशीसाठी बोलावलं. सुरुवातीला त्याने दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, मात्र तांत्रिक पुरावे समोर येताच त्याने खुनाची कबुली दिली.

**•नेमकं काय घडलं?**

राणी आणि अनिकेत दोघेही विवाहित होते आणि त्यांना मुलेही होती. राणीच्या घरच्यांना त्यांच्या प्रेमसंबंधांची माहिती मिळाल्यानंतर ती नवऱ्यापासून दूर जाऊन अनिकेतसोबत राहण्याचा आणि लग्न करण्याचा हट्ट धरत होती. परंतु अनिकेत स्वतः विवाहित असल्याने तो यासाठी तयार नव्हता. तिच्या सततच्या तगाद्यामुळे अनिकेत त्रस्त झाला होता.

दरम्यान, २६ नोव्हेंबर रोजी अनिकेतने राणीला फिरण्यासाठी बोलावले. दोघेही कारमधून फिरत असताना त्यांच्यात सोबत राहण्यावरून व लग्नावरून पुन्हा वाद झाला. आधीच खुनाचा निर्णय घेतलेल्या अनिकेतने राणीला गावी घेऊन जातो असं सांगून कार धाराशीव जिल्ह्याच्या दिशेने वळवली. २७ नोव्हेंबर रोजी पहाटे ढोकी गावाजवळ कार थांबवून, झोपेत असलेल्या राणीचा गळा दाबून त्याने तिचा खून केला. त्यानंतर लोखंडी रॉडनेही तिच्यावर वार केले. घाबरलेल्या अवस्थेत त्याने मृतदेह रस्त्याच्या कडेला टाकला आणि पुरावा नष्ट करण्यासाठी पेट्रोल टाकून मृतदेह जाळण्याचा प्रयत्न केला.

तपासात सर्व पुरावे अनिकेतविरुद्ध मिळाल्यानंतर वाकड पोलिसांनी त्याला अटक केली असून राणीच्या हत्येप्रकरणी खून आणि पुरावा नष्ट करण्याच्या कलमांनुसार त्याच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## नाशिकमध्ये एकाच घरात चार जणांच्या बॉडी

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.३०, देवळा :** नाशिकमधील चांदवड तालुक्यातील दिघवडची घटना ताजी असतानाच फुलेमाळवाडी (ता.देवळा) येथील गोविंदा बाळकृष्ण शेवाळे (वय ४०) या युवकाने पत्नी आणि दोन लहान मुलांना संपवत स्वतः ही फाशी घेतल्याची धक्कादायक घटना समोर येत आहे. रविवार (ता.३०) रोजी सकाळी ही घटना उघडकीस आली. याचा अर्थ ही घटना रात्री घडली असल्याचे स्पष्ट आहे.

गोविंदा शेवाळे यांनी हे टोकाचे पाऊल उचलण्यापूर्वी व्हॉट्स ॲपवर 'भावपूर्ण श्रद्धांजली' असे स्टेट्स टाकले होते. हे स्टेट्स शेवाळे यांच्या लहान भावाने पाहिले आणि त्याला काहीतरी अनुचित घडल्याची शंका आली. त्याने तात्काळ इतर नातेवाईकांना फोनद्वारे याची माहिती दिली. त्यानंतर शेवाळे कुटुंबीयांच्या निवासस्थानी गेल्यावर भयानक घटना उघडकीस आली. घटनास्थळी मोठी गर्दी जमा झाल्याने पोलिसांनी जमावाला नियंत्रित केले. हत्या की आत्महत्या याबाबतच्या कारणांचा शोध घेण्यासाठी फॉरेन्सिक टीम तपासणी करणार आहे.

स्वतःच्या मृत्यूचे संकेत देणारा 'भावपूर्ण श्रद्धांजली' हा स्टेटस पाहिल्यानंतर, ही घटना पूर्वनियोजित असावी अशी शक्यता व्यक्त होत आहे. या दुर्दैवी घटनेत कोमल गोविंद शेवाळे (वय ३५), ख़ुशी गोविंद शेवाळे (वय ८), श्याम गोविंद शेवाळे (दीड वर्षे) यांचा बळी गेल्याने त्यांचेमृतदेह स्वतःच्या घरात आढळून आल्याची घटना आज सकाळी घडली आहे.

## रोमांचक सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा १७ धावांनी केला पराभव



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.३०, रांची :** भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील ३ सामन्यांच्या रोमांचक टी-२० मालिकेतील पहिला सामना रांचीच्या जेएससीए आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवला गेला. ज्या टी२० सामन्यात शेवटच्या षटकात टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेचा १७ धावांनी पराभव करत विजय मिळवला. या विजयासह भारताने ३ सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. भारतीय संघाचा हा विजय विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या दमदार कामगिरीमुळे अधिक संस्मरणीय ठरला.

प्रथम फलंदाजी करताना भारताने विराट कोहलीच्या शतक आणि रोहित शर्मा आणि केएल राहुलच्या अर्धशतकांच्या जोरावर ५० षटकांत आठ बाद ३४९ धावा केल्या. प्रत्युत्तर दक्षिण आफ्रिकेचा संघ ४९.२ षटकांत ३३२ धावांतच गारद झाला. पाहुण्या संघाकडून मॅथ्यू ब्रिट्झके (७२), मार्को जॅन्सन (७०) आणि कॉर्बिन बॉश (६७) यांनी अर्धशतके झळकावली. भारताकडून कुलदीप यादवने चार, तर हर्षित राणा यांनी तीन बळी घेतले. अर्शदीप सिंगने दोन, तर प्रसिद्ध कृष्णाने एक बळी घेतला. रोहित-विराटची १३६ धावांची शतकी भागीदारी

पहिल्यांदा फलंदाजीसाठी उतरलेल्या टीम इंडियाची सुरुवात मात्र काही खास झाली नाही. फक्त चौथ्याच षटकात यशस्वी जैस्वाल १८ धावांवर बाद झाला. त्याच ओव्हरमध्ये रोहित शर्माचा एक झेलही सुटला. पण त्यानंतर रोहित आणि विराट कोहली याने डाव सावरला. रोहित-विराट यांनी मिळून १३६ धावांची शतकी भागीदारी करत दक्षिण आफ्रिकेवर दबाव आणला. या सामन्यात रोहित शर्माने शाहिद आफ्रिदीचा विक्रम मोडत वनडेमधील सर्वाधिक षटकार ठोकणारा खेळाडू बनला.

**रोहित आउट झाला, पण कोहलीने ठोकले शतक**

टीम इंडिला दुसरा धक्का २२व्या षटकात बसला, जेव्हा रोहित ५१ चेंडूत ५७ धावा करून बाद झाला. त्याने आपल्या खेळीत ५ चौकार आणि ३ षटकार लगावले. २७व्या षटकात ऋतुराज ८ धावांवर माघारी परतला, तर ३१व्या षटकात वॉशिंग्टन सुंदर १३ धावांवर बाद झाला. यानंतर विराट कोहलीने जबरदस्त खेळी करत ३८व्या षटकात आपले शतक पूर्ण केले. १०२ चेंडूत शतक ठोकणाऱ्या कोहलीने अखेरीस ११ चौकार आणि ७ षटकारांच्या जोरावर १२० चेंडूत १३५ धावा केल्या. त्याला नांद्रे बर्गरने बाद केले. शेवटी केएल राहुलनेही ६० धावांची महत्वाची खेळी करत भारताला मजबूत स्थितीत पोहोचवलं आणि टीम इंडियाने पहिल्या डावात ३५० धावांचा डोंगर उभारला.

**दक्षिण आफ्रिकेची खराब सुरुवात !**

३५० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या दक्षिण आफ्रिकेची सुरुवात अत्यंत खराब झाली. डावाच्या दुसऱ्याच षटकात हर्षित राणाने त्यांना दोन जबरदस्त धक्के दिले. आधी रयान रिकेल्टन बाद झाला आणि त्याच ओव्हरमध्ये क्विंटन डी कॉकलाही पॅव्हेलियनमध्ये पाठवलं. त्या वेळी आफ्रिकेचा स्कोर फक्त ७ धावा होता. यानंतर पाचव्या षटकात मार्करम ही अर्शदीप सिंगचा शिकार झाला.

पुढे जोर्जी आणि मॅथ्यू यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न करत चांगली भागीदारी रचली. मात्र १५व्या षटकात कुलदीप यादवने जोर्जीला बाद करून भारताला मोठा दिलासा दिला. त्यानंतर ब्रेविसने चांगली खेळी केली, पण २२व्या षटकात हर्षित राणा पुन्हा चमकला आणि ब्रेविस ३७ धावांवर बाद झाला.

**जान्सेन आणि ब्रिट्जकेची तुफानी फटकेबाजी, कुलदीपने दोघांना तंबूत धाडले...**

यानंतर जान्सेन आणि ब्रिट्जके यांनी ९७ धावांची भागीदारी करत भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. जान्सेनने केवळ २६ चेंडूत अर्धशतक ठोकले. परंतु ३३व्या षटकात कुलदीप यादवने ही भागीदारी मोडत जान्सेनला ३९ चेंडूत ७० धावांवर बाद केले. त्याच्या खेळीत ८ चौकार आणि ३ षटकार होते. याच षटकात कुलदीपने ब्रिट्जकेलाही तंबूत धाडले. ब्रिट्जकेने ७२ धावा केल्या. पण त्यानंतर, बर्गर आणि बॉसने एक चांगली भागीदारी केली.

पण, अर्शदीपने ४७ व्या षटकात बर्गरला बाद केले आणि सामना भारताच्या बाजूने फिरवला. दक्षिण आफ्रिकेला शेवटच्या षटकात १८ धावांची आवश्यकता होती, परंतु प्रसिद्ध कृष्णाने बॉसला बाद केले. यासह, दक्षिण आफ्रिकेचा संघ ३३२ धावांवर गारद झाला. भारताने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते सुचना पुस्तिकेचे व भित्तीपत्रकाचे प्रकाशन

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.३०, मुंबई :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी मुंबई येथे अभिवादनासाठी येणाऱ्या अभ्यागतांसाठी तयार करण्यात आलेल्या सुचना पुस्तिकेचे व भित्तीपत्रकाचे प्रकाशन राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते राजभवन, मुंबई येथे करण्यात आले.

यावेळी बोलताना राज्यपालांनी डॉ.आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत समरसता व बंधुभाव या मूल्यांच्या प्रचार प्रसारासाठी आपण विविध तालुक्यांना भेट देण्याचा उपक्रम हाती घेतला असल्याचे राज्यपालांनी यावेळी सांगितले. आजपर्यंत आपण गुजरात येथील ११ गावांना भेट दिली असून त्याठिकाणी ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, ग्रामसभा, दलित - आदिवासी कुटुंबाच्या घरी भोजन, शाळेत मुक्काम व दुसऱ्या दिवशी शिवारावर जाऊन लोकांना नैसर्गिक शेतीचे महत्व पटवणे हा उपक्रम सुरु केला असल्याचे राज्यपालांनी सांगितले. महाराष्ट्रात देखील हा उपक्रम सुरु करणार असल्याचे त्यांनी सांगितले.




यावेळी महाराष्ट्र राज्य त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे तसेच समितीचे इतर सदस्य उपस्थित होते.




## अमेरिकेविना विश्वगाडा चाले...

दोन दिवस. एक जागतिक मंच. आणि एक राष्ट्राचा ठाम बहिष्कार. या पार्श्वभूमीवर २२ ते २३ नोव्हेंबर २०२५ रोजी जोहान्सबर्गमध्ये पार पडलेले जी-२० शिखर संमेलन केवळ एक परिषदेपुरते मर्यादित राहिले नाही. ते एक तीव्र राजकीय विधान ठरले की अमेरिका नसली, तरी जगाचे चक्र थांबत नाही. आणि या विधानाच्या केंद्रस्थानी होते आफ्रिका, जी अनेक दशकांपासून जागतिक नेतृत्वाच्या केंद्रबिंदूच्या बाहेर राहिली होती. याच संमेलनातून एका नव्या जागतिक युगाची बीजे पेरली गेली आहेत, जिथे बहुध्रुवीय सहकार्य आणि सामूहिक निर्णय हे केवळ आदर्श शब्द नाहीत, तर कृतीत उतरलेले वास्तव आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या संमेलनावर बहिष्कार टाकला. कारण दक्षिण आफ्रिकेतील 'श्वेत अल्पसंख्याकांवरील अत्याचार'. हा आरोप आंतरराष्ट्रीय पातळीवर हास्यास्पद ठरवला गेला. पण ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिका यापूर्वीही हवामान बदल, समानता, आणि मल्टिलॅटरल सहकार्यातून पळ काढत असल्याचे दिसून आले आहे.

जी-२० च्या जोहान्सबर्ग अजेंडावर 'सस्टेनेबिलिटी, इक्वॅलिटी आणि सॉलिडॅरिटी' हे तीन मुद्दे होते- हेच मुद्दे ट्रम्प प्रशासनाला 'डावा अतिरेक' वाटले. त्यामुळे अमेरिकेने संमेलनात सहभागी होणे नाकारले. पण प्रश्न असा आहे- अमेरिका नसेल तर जग थांबते का? उत्तर स्पष्ट आहे: नाही. कारण जी प्रक्रिया अमेरिकेने थांबवायचा प्रयत्न केला, तीच प्रक्रिया जोहान्सबर्गमध्ये एकमताने पुढे नेण्यात आली. एका हॉट-माइक प्रसंगातून स्पष्ट झाले की अध्यक्ष सिरिल रामाफोसा यांनी संमेलनाच्या सुरुवातीलाच घोषणापत्र संमतीने पुढे नेण्याचा निर्णय घेतला- तेही पारंपरिक शेवटाच्या सत्राऐवजी सुरुवातीलाच. यामागे उद्देश स्पष्ट होता, अमेरिका आणि तिच्या सहकाऱ्यांनी दगाफटका करू नये. आणि हे निर्णय फक्त राजनैतिक नव्हते; ते नीतिगत होते. १२२ मुद्द्यांच्या घोषणापत्रात हवामान संकट, ऋण-संकट, असमानता, आणि पॅलेस्टाइन संघर्षावर भाष्य करण्यात आले. आणि हे सर्व, ट्रम्प यांच्या तीव्र विरोधानंतर घडले.

विशेष म्हणजे, अर्जेंटिनानेदेखील घोषणापत्रावर सह्या करण्यास नकार दिला. ट्रम्प समर्थक नवे अध्यक्ष जेवियर मिलेई यांच्या अनुपस्थितीत, अर्जेंटिना देखील या नव्या बहुपक्षीय सहकार्यातून बाजूला राहिले. पण यामुळे कोणताही निर्णय स्थगित झाला नाही. अध्यक्ष रामाफोसा यांनी 'पर्याप्त सहमती' या संकल्पनेवर भर दिला म्हणजेच, अमेरिकेच्या अनुपस्थितीतही जगाच्या बहुतांश देशांनी पुढे चालण्याचा निर्णय घेतला.

या संमेलनाची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अमेरिकेशिवायही जागतिक नेतृत्व शक्य आहे, हे या मंचाने ठणकावून दाखवले. याआधी अनेकदा 'कोणतीही संयुक्त घोषणा अमेरिकेच्या मंजुरीशिवाय शक्य नाही,' असे मानले जायचे. पण जोहान्सबर्गने ही संकल्पना धुळीत मिळवली. ट्रम्प प्रशासनाने हवामान बदलासंदर्भातील कोणत्याही उल्लेखास विरोध केला होता. मात्र घोषणापत्राने त्याचे गांभीर्य अधोरेखित केले आणि नवीकरणीय ऊर्जेसाठी उद्दिष्टे निश्चित केली. हे होते जागतिक हिताच्या बाजूने घेतलेले निर्णय, एका राष्ट्राच्या आत्मकेंद्री असहमतीवर मात करणारे.

या घोषणेमध्ये केवळ हवामान संकट नाही, तर ऋण व्यवस्थापन, मल्टिलॅटरल विकास बँकांचे पुनर्रचना, आणि आफ्रिकन राष्ट्रांच्या प्रतिनिधित्वावरदेखील ठोस भूमिका घेतली गेली. विशेषतः आफ्रिकन युनियनच्या जी-२० सदस्यत्वामुळे, पहिल्यांदाच आफ्रिकन राष्ट्रांनी विकासविषयक अजेंड्यावर प्रभाव टाकला. या घोषणेमध्ये जलवायू बदलाच्या अनुषंगाने 'न्याय्य संक्रमण', कार्बन-निरपेक्ष ऊर्जेचे उद्दिष्ट, आणि कमी उत्पन्न असलेल्या देशांसाठी निधी संकलनास प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला. या घोषणेमध्ये समाविष्ट असलेल्या अनेक मुद्द्यांचा मागोवा घेतल्यास लक्षात येते की ते मोठ्या प्रमाणावर दक्षिण आफ्रिकेच्या अध्यक्षीय अजेंड्याशी सुसंगत आहेत, हेच अमेरिकेच्या विरोधात होते.

या संमेलनात सहभागी झालेल्या इतर राष्ट्रांनी, फ्रान्स, जर्मनी, चीन, भारत, ब्राझील यांसारख्या देशांनी अमेरिकेच्या अनुपस्थितीला दुर्दैवी मानले, पण त्याचे निमित्त करून थांबणे टाळले. फ्रेंच अध्यक्ष मॅक्रॉन यांनी स्पष्टपणे सांगितले, की 'आपण थांबता कामा नये.' चीनच्या पंतप्रधानांनी जी-२० ला एकतेकडे नेण्याचे आवाहन केले, तर भारताने मागील वर्षीच्या अध्यक्षपदाचा अनुभव वापरत विकासासाठी समन्वयावर भर दिला. एकंदरीत, ही एकत्रित भूमिका दर्शवते की जग आता एकसंध निर्णय घेण्यास सक्षम आहे, विशेषतः जेव्हा अमेरिकेसारखा देश अनुपस्थित असेल तेव्हा! या सर्व प्रक्रियेमध्ये जी-२० चे स्वरूपही अधिक दृढ झाले. अनेक वर्षांपासून 'फक्त चर्चेचा मंच' म्हणून ओळखले जाणारे जी-२० आता प्रत्यक्ष कृतीसाठी सक्षम आहे, हे सिद्ध झाले. जोहान्सबर्गच्या घोषणेमुळे हेही स्पष्ट झाले की सदस्य राष्ट्रांमध्ये समानता हवी, निर्णयप्रक्रिया पारदर्शक असावी, आणि विकासशील देशांच्या हितसंबंधांना केंद्रस्थानी स्थान मिळावे. हे विचार केवळ राजनैतिक घोषवाक्य नव्हते, तर प्रत्यक्ष कृतीमध्ये उतरले गेले.

# हिवाळी अधिवेशनात 'लव्ह जिहाद' विरोधी कायदा पारित व्हावा !

गेल्या काही वर्षांत 'लव्ह जिहाद'ने केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभर थैमान घातले आहे याबाबत कोणाचेही दुमत नसावे. लव्ह जिहाद हे केवळ मुलींना बाटवण्याचे कारस्थान नसून हिंदूच्या वंशवृद्धीवर घाला घालण्यासाठी आखलेले देशव्यापी षडयंत्र आहे. आजतागायत लाखो मुली या षड्यंत्राला बळी पडल्या आहेत. कित्येकांचे घरदार यामुळे उध्वस्त झाले आहे. याबाबतचे गांभीर्य ओळखून उत्तर प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, गुजरात, झारखंड, मध्यप्रदेश, उत्तराखंड, ओडिसा आणि छत्तीसगड या नऊ राज्यांनी लव्ह जिहादविरोधी कायदा पारित केला आहे. महाराष्ट्रातही लव्ह जिहादविरोधी कायदा करण्यात यावा ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून हिंदुत्ववादी संघटना, संप्रदाय आणि मंडळांकडून करण्यात येत आहे. याचे फलित म्हणून राज्य सरकारने फेब्रुवारी मासात पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही राज्यात लवकरच लव्ह जिहाद आणि फसवणूक , बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण रोखण्यासाठी कायदा करण्यात येणार असल्याचे सूतोवाच यापूर्वीच केले आहे. त्यामुळे येत्या हिवाळी अधिवेशनात हा कायदा महाराष्ट्रातही पारित करण्यात यावा या मागणीसाठी जळगावमध्ये ३५ हुन अधिक संघटनांनी एकत्र येऊन आंदोलन केले. या आंदोलनानंतर माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी विविध मागण्याही केल्या आहेत ज्यामध्ये लव्ह जिहादविरोधी कायद्यान्वये अटक करण्यात आलेल्या गुन्हेगारावर अजामीनपात्र गुन्हा नोंदवण्यात यावा तसेच आरोपीस आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावण्याची मागणी करण्यात आली आहे. 'लव्ह जिहाद' संदर्भातील गुन्ह्यांच्या



नोंदीसाठी पोलिसांची विशेष शाखा स्थापन करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली असून यासाठी विदेशातून होणारा अर्थपुरवठा, आरोपीची बँकखाती, आरोपीचे जिहादी संघटनांशी असलेले संबंध. त्याला सहकार्य करणारे, प्रोत्साहन देणारे यांचीही सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

हिंदू तरूणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढायचे, त्यांच्याशी शारीरिक संबंध ठेवायचे त्या दरम्यान त्यांच्या व्हिडीओ क्लिप्स बनवायच्या, त्याआधारे त्यांना ब्लॅकमेल करायचे, त्यांच्याशी निकाह करायचा, मुले जन्माला घालायची आणि नंतर वाऱ्यावर सोडून द्यायचे किंवा त्यांना देहविक्रय करायला भाग पाडायचे नाहीतर अरब राष्ट्रांत विकायचे, दहशतवादी कारवायांसाठी त्यांचा वापर करायचा, त्यांच्या अवयवांची विक्री करायची अशा प्रकारचे षडयंत्र आज 'लव्ह जिहाद'च्या नावाने देशभर सुरु आहे. आंतरराष्ट्रीय किर्तीची नेमबाज तारा सहदेव हिलाही लव्ह जिहादला सामोरे जावे लागले होते. आजमितीला केरळ आणि कर्नाटक राज्यात लव्ह जिहाद इतक्या मोठ्या प्रमाणात फोफावला आहे, की केरळ उच्च न्यायालयाने लव्ह जिहादची स्वतंत्र चौकशी करण्याचे आदेश दिले होते. केरळमधील लव्ह जिहादचे वास्तव स्पष्ट करणारा सत्य घटनेवर आधारित दि केरळा स्टोरी नावाचा चित्रपटही येऊन गेला. या चित्रपटाने लव्ह जिहादचे रॅकेट कशाप्रकारे काम करते हे समस्त भारतीयांसमोर उघड केले. याशिवाय लव्ह जिहादला बळी पडलेल्या मुलींच्या शेकडो मुलाखती आज यु ट्यूबवर उपलब्ध आहेत. पोटच्या मुलीला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपावे, तिला शिकवावे, तिचे सर्व हट्ट पुरवावे आणि वयात आल्यावर तिच्यासाठी सुयोग्य वर शोधून तिचे कन्यादान करावे अशी प्रत्येक आई वडिलांची माफक इच्छा असते. अशी लाडाप्रेमाने वाढवलेली मुलगी कोणाच्या तरी फसव्या प्रलोभनांना फसते आणि आई वडिलांना झुगारून धर्मपरिवर्तन करते हे कोणत्याही आई वडिलांच्या काळजावर घाव करणारेच आहे. मुलीने स्वत:च्या मनाने निवडलेला जोडीदार तिला सुखाने नांदवणारा आहे हे कळल्यावर पालकांचा राग उणावतोही; मात्र आपली लाडकी मुलगी एका जिहादी संकटाला बळी पडली असून तिच्या आयुष्याची पुरती फरफट झाल्याचे ऐकून त्या आईबापाचे ह्रदय किती पिळवटून निघत असेल याचा विचार कोणी केला आहे का ? देशभरातील अशा लाखो मुली या षडयंत्राला बळी पडल्या आहेत. माध्यमांसमोर येऊन आपली व्यथा मांडण्याचे धाडस सर्वांमध्ये नसते. त्यापैकी काही निमूटपणे अन्याय सहन करतात, तर काही कुंटणखाना हेच आपले घर मानून प्रतिदिन मरणयातना सहन करतात. धर्मनिरपेक्ष राष्ट्रात प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचा घटनादत्त अधिकार असून फूस लावून, प्रलोभने दाखवून किंवा बळाचा वापर करून धर्मांतरण करणे कायद्याने गुन्हा आहे. असे असतांना लव्ह जिहादच्या अंतर्गत हिंदू मुलींना फूस लावून किंवा त्यांच्यावर जबरदस्ती करून त्यांचे धर्मांतरण केले जात आहे. पहिल्या पत्नीची संमती असल्याविना दुसरी पत्नी करणे हा कायद्याने दखलपात्र गुन्हा असतांना हिंदू मुलींशी निकाह करून त्यांचा उपभोग घेऊन त्यांना वाऱ्यावर सोडून सर्रासपणे दुसरा निकाह केला जातो. राज्यात लव्ह जिहाद विरोधी कायदा आल्यावर गुन्हेगारांना कायद्याने शासन होईलच; मात्र अशा षड्यंत्राला आपल्या घरातील कोणतीही स्त्री बळी पडता कामा नये याची काळजी आपणच घ्यायला हवी. आज लव्ह जिहाद दारापर्यंत येऊन ठेपला आहे. उद्या तो आपल्या घरातही येऊ शकतो यासाठी प्रत्येक हिंदु मुलीने आणि तिच्या पालकाने सतर्क रहायला हवे !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## शिक्के..

गुन्हेगार म्हणून जे
एकदा बसे शिक्के
पुसत नाही रूपडे
रंग अतिशय पक्के

शांतज्वालामुखीचे
सतत बसते धक्के
मोजदाद करतराहे
सबघोडे बाराटक्के

जख्म भळाळ वाहे
उसवून जाती टाके
भेसूर भयरुप दावे
आरसेजरीही झाके

सरळ मार्गी वागता
आडवे खूपसे नाके
कितीकरे तपासणी
थांबवती टोल नाके

सुधारतोयं हळूहळू
बिथरुन टाके डोके
सफाईने चौर्य कर्म
कधी टाकता डाके

हालचालीवर सूक्ष्म
नजर सारखी रोखे
औत्सुक्य ते किती
कुणांसदेणार धोके

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# नेपाळची नवी खोड !

नेपाळ हा भारताचा सख्खा शेजारी देश. जगातील एकमेव हिंदू धर्मीय देश. भारत हा देखील हिंदू संस्कृतीचा पाईक त्यामुळे दोन्ही देशातील चालीरीती, संस्कृती, सण, उत्सव, परंपरा सारखीच त्यामुळे नेपाळ हा भारताचा शेजारी आसला तरी भारताने त्याला कायम छोट्या भावा सारखीच वागणूक दिली आहे. नेपाळवर ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्या वेळी भारतच धावून गेला त्यामुळे गेल्या अनेक शतकांपासून भारत आणि नेपाळचे संबंध मैत्रीपूर्ण आणि सौहार्दाचे राहिले आहेत.

मात्र या संबंधांना मागील काही वर्षात तडा गेला आहे. भारत नेपाळ संबंधातील सौहार्दात कटुता निर्माण होऊन दोन्ही देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. हा तणाव कमी करून दोन्ही देशात पूर्वी प्रमाणे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारताकडून होत असताना नेपाळ मात्र काही खोड काढून दोन्ही देशातील तणाव कायम ठेवत आहे. नेपाळने अशीच एक नवी खोड काढून दोन्ही देशातील तणाव पुन्हा वाढवला आहे. नेपाळने गुरुवारी १०० रुपयांच्या नोटेचे अनावरण केले. या नोटा छापण्याचे कंत्राट त्यांनी चीनमधील एका कंपनीला दिले आहे अर्थात तो त्यांचा अधिकार आहे. नोटा बदलण्याचा, त्याची डिझाईन बदलण्याचा, आणि त्याची छपाई कोठून करायची याचा सर्वस्व अधिकार नेपाळचा असल्याने भारताने त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही भारताने यावर आक्षेप घेतला नाही मात्र या नोटाचे अनावरण करण्यात आले त्यावेळी मात्र भारताने त्यावर आक्षेप घेतला कारण या नव्या नोटेवर नेपाळने त्यांचा नवा सुधारित नकाशा छापला असून त्या नकाशात लीपुलेख, लिम्पियाधूरा आणि कालापाणी हे भूभाग नेपाळमध्ये दाखवले आहेत. वास्तविक भारत - नेपाळ सीमेवरील हे भूभाग भारतीय सीमेत आहे मात्र नेपाळ त्यावर दावा करत आहे. खूप वर्षापासून हा वाद चालू असल्याने दोन्ही देशात यावरून अनेकदा तणाव निर्माण झाला.

हा वादग्रस्त भाग असल्याने नेपाळने त्यावर दावा करू नये असे भारताचे म्हणणे आहे. तरीही नेपाळ हा विषय ऐन केन प्रकरणाने उकरून काढत आहे. नेपाळ भारताची सातत्याने खोड काढत आहे कारण त्याला चीनची फुस आहे. मागील काही वर्षापासून नेपाळ हा चीनच्या नादी लागला आहे. चीनने नेपाळला कर्ज देऊन नेपाळला आपल्या अंकित केले आहे. नेपाळचे सध्याचे सरकार हे चीन धार्जिणे आहे. चीन सांगेल तेच ते करत आहे एकाअर्थी नेपाळमधील विद्यमान सरकार हे चीनच्या हातचे बाहुले आहे त्यामुळेच चीन सांगेल त्याप्रमाणे नेपाळचे सरकार वागत आहे. भारतानेही नेपाळला वेळोवेळी त्यांची चूक दाखवून खडसावले आहे आताही भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी भारताची बाजू स्पष्ट करतांना म्हंटले की नेपाळशही आम्ही आमच्या सीमा प्रकरणांवर एका प्रस्थापित मंचाद्वरे चर्चा करीत आहोत. दरम्यान त्यांच्या बाजूने त्यांनी काही एकतर्फी पावले उचलली आहेत, परंतु त्यांच्याकडून काहीही करून आमच्यातील परिस्थिती किंवा वास्तविकता बदलता येणार नाही.

**● काय आहे सीमा वाद ?**

१८१६ मधील अँग्लो - नेपाळ युद्धानंतर नेपाळ आणि ब्रिटिश शासित भारत यांच्यात सुगौलीचा करार झाला. हा करार झाल्यापासून भारत आणि नेपाळ यांच्यात सीमावाद सुरू झाला. या करारा नुसार काली नदीला नेपाळची नैसर्गिक पश्चिम सीमा म्हणून निश्चित करण्यात आली. काली नदीचा पूर्वेकडच्या भागात लिपुलेख, लिम्पियाधुरा आणि कालापानी हा भाग आहे. १९६० पासून हा भाग भारतीय प्रशासनाच्या नियंत्रणाखाली आहे. २०१९ साली नेपाळने या भूभागावर हक्क सांगितल्यावर भारताने त्यावर हरकत घेतली. त्यानंतर २०२० साली नेपाळने आपल्या नकाशात हा भूभाग दाखवला तेंव्हापासून दोन्ही देशात तणाव निर्माण झाला. भारताकडून हा तणाव कमी करण्याचा सातत्याने प्रयत्न होत असताना नेपाळ मात्र चीनच्या नादी लागून सतत भारताच्या कुरापती काढत आहे. आताही चलनी नोटेवर हा भूभाग दाखवून नेपाळने भारताची खोड काढून दोन्ही देशातील तणाव आणखी वाढवला आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# आरबीआयच्या पतधोरणविषयक समितीची लवकरच बैठक,
## रेपो रेट कमी करण्याची शक्यता, गृहकर्जाचा हप्ता कमी होणार?

**दि.२९, नवी दिल्ली :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या पतधोरण विषयक समितीची बैठक ३ डिसेंबर ते ५ डिसेंबर या दरम्यान पार पडणार आहे. महागाईचा दबाव कमी असल्यानं आरबीआयकडून ५ डिसेंबरला रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉईंट कपात करण्याची शक्यता आहे. रेपो रेटमध्ये कपात केल्यास गृह कर्ज आणि वाहन कर्जाचे व्याज दर कमी होतील. यामुळं गृहकर्ज आणि वाहन कर्ज असलेल्यांचा ईएमआय कमी होईल.

**आरबीआयची पतधोरण विषयक समिती**

आरबीआयच्या पतधोरण विषयक समितीची बैठक ३ डिसेंबरपासून सुरु होईल. या बैठकीत रेपो रेट आणि इतर गोष्टींवर चर्चा करुन निर्णय घेतले जातील. रेपो रेट संदर्भातील निर्णय ५ डिसेंबरला जाहीर केले जातील. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा सकाळी १० वाजता रेपो रेट जाहीर करतील.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं फेब्रुवारी महिन्यात रेपो रेटमध्ये कपात केली होती. त्यानंतर पुन्हा रेपो रेट कमी करण्यात आला. २०२५ मध्ये रेपो रेट ६.५ टक्क्यांवरुन ५.५ टक्क्यांवर आणला आहे. आरबीआय डिसेंबरच्या पतधोरण विषयक समितीच्या बैठकीनंतर २५ बेसिस पॉईंटची कपात करु शकते. त्यामुळं रेपो रेट ५.२५ टक्क्यांवर येऊ शकतो.

सीपीआय वर आधारित किरकोळ महागाई गेल्या दोन महिन्यांपासून सरकारनं निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा २ टक्के खाली आहे. महागाईचा दबाव कमी झाल्यानं रेपो रेटमध्ये कपात आरबीआयकडून जाहीर केली जाऊ शकते. दुसऱ्या तिमाहीतील जीडीपीचा विकास दर ८.२ टक्के आहे. त्यामुळं




आरबीआयकडून रेपो रेटमध्ये कपात केली जाण्याची शक्यता आहे. आरबीआयनं रेपो रेटमध्ये कपात केल्यास गृहकर्ज आणि वाहन कर्जाचा व्याज दर देखील कमी होऊ शकतो. आरबीआयकडून बँकांना ज्या व्याज दरानं कर्ज दिलं जातं त्याला रेपो रेट म्हणतात. आरबीआयनं रेपो रेट कमी केल्यानंतर बँका व्याज दरात कपात करतात. त्यामुळं गृह कर्ज आणि वाहन कर्ज स्वस्त होऊ शकतं.

क्रिसिलचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ धर्मकीर्ति जोशी यांनी महागाई कमी असणं, जीएसटी स्लॅबच्या दरातील कपात आणि इतर गोष्टींमुळं रेपो रेटमध्ये कपात होऊ शकते असा अंदाज वर्तवला आहे. एचडीएफसी बँकेच्या रिपोर्टनुसार देखील रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉईंटची कपात केली जाण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचं गव्हर्नर पद संजय म्हलोत्रा यांनी स्वीकारल्यानंतर पहिल्यांदा फेब्रुवारी २०२५ मध्ये रेपो रेट २५ बेसिस पॉईंटनं कमी करुन ६.२५ टक्क्यांवर आणला होता. त्यानंतर एप्रिलमध्ये रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉईंटची कपात करत तो ६.०० टक्क्यांवर आणला. यानंतर पुन्हा एकदा जून २०२५ मध्ये रेपो रेटमध्ये ५० बेसिस पॉईंटची कपात करण्यात आली आणि रेपो रेट ५.५० टक्क्यांवर आणला. ऑगस्टपासून रेपो रेटमध्ये बदल करण्यात आलेले नाहीत.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## राज्यपालांच्या हस्ते अनुपम खेर यांना डीएव्ही रत्न पुरस्कार प्रदान



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, मुंबई :** शिमला येथील डीएव्ही पब्लिक स्कूलचे माजी विद्यार्थी असलेले प्रसिद्ध अभिनेते अनुपम खेर यांना राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते डीएव्ही रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राजभवन येथे राज्यपालांच्या हस्ते डीएव्ही व्यवस्थापन समितीतर्फे संस्थेच्या प्रथितयश माजी विद्यार्थ्यांचा सत्कार नुकताच करण्यात आला. राज्यपालांनी यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच विविध क्षेत्रांच्या माध्यमातून देशाला योगदान देत असल्याबद्दल त्यांना कौतुकाची थाप दिली.

शिमला येथील डीएव्ही पब्लिक स्कूल येथे आपण पहिली ते अकरावी इतकी वर्षे शिक्षण घेतले. या संस्थेने आपल्याला भारतीय मूल्ये तसेच देश भक्तीचे संस्कार दिले, असे सांगताना आपल्या जीवनात डीएव्ही पब्लिक स्कूलचे महत्व अनन्य साधारण असल्याचे अनुपम खेर यांनी सांगितले. त्या काळातले शिक्षक विद्यार्थ्यांना कठोर शिक्षा द्यायचे, परंतु ते प्रेम व संस्कार देखील द्यायचे असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला राज्यपालांच्या पत्नी दर्शना देवी, डीएव्ही कॉलेज व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पूनम सुरी, डीएव्हीच्या संचालिका डॉ. निशा पेशीन तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## मतदानाच्या दिवशी कामगारांना भरपगारी सुट्टी

### अथवा २ - ३ तासांची सवलत देण्याचे आदेश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक - २०२५ मध्ये मतदान करण्याकरीता चंद्रपूर जिल्ह्यात काम करणाऱ्या कामगार मतदारांना मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी अथवा २ ते ३ तासाची सवलत देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाचे उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या शासन निर्णयान्वये सर्व दुकाने, आस्थापना, व्यापारी संस्था, हॉटेल, रेस्टॉरंट, नाट्यगृहे, औद्योगिक उपक्रम, कारखाने किंवा इतर व्यापारी आस्थापनांमध्ये कार्यरत असलेल्या कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्याकरीता मतदानाच्या दिवशी सुट्टी दिली जाईल. सदर सुट्टी उद्योग, उर्जा व कामगार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने आदींना लागू राहील. (खाजगी कंपन्यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्नगृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम, किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इत्यादी.) अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल, अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात अधिकारी, कर्मचारी व कामगार आदींना पुर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी २ ते ३ तासांची सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

वर नमूद केल्यानुसार आस्थापनांच्या मालकांनी / व्यवस्थापनाने वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. मतदारांकडून मतदानाकरीता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता आले नाही, अशी तक्रार आल्यास, त्यांच्याविरुध्द योग्य कारवाई करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी. या संदर्भात कामगारांनी आपली तक्रार सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, बस स्टँड समोर, चंद्रपूर येथे स्थापित केलेल्या नियंत्रण कक्षात प्रत्यक्षात किंवा ई-मेल द्वारे तक्रार करावी, असे कामगार विभागाने कळविले आहे.

## शिरवळ नगरीची ओळख क्रीडानगरी म्हणून करणार - डॉ.शिंदे



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.३०, खंडाळा (सातारा) :** शिरवळ जिमखाना याचे वतीने नुकतेच शिरवळ येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी बॅडमिंटन स्पर्धा दि.२९ व ३० डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आली होती.

यामध्ये ६० हुन आधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेचे उद्घाटन शिरवळ नगरीचे लोकनियुक्त सरपंच रविराज दुधगावकर, उपसरपंच अमोल कबुले शिरवळ जिमखाना अध्यक्ष डॉ.विजय शिंदे, समर्पण फौंडेशनचे अभिजित कबुले व कबुले कुटुंबियांनी यांनी केले. यावेळी सदस्य प्रकाश परखंदे, अॅड.आनंद फडके, जिमखाना सदस्य व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. बक्षीस वितरण सरपंच रविराज दुधगावकर जिमखाना अध्यक्ष डॉ.विजय शिंदे जिमखाना सदस्य डॉ.राजेंद्र देशमुख, हर्ष जोशी व इतर मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना सरपंच रविराज दुधगावकर म्हणाले शिरवळच्या क्रिडा विकासात शिरवळ जिमखान्याचा सिंहाचा वाटा आहे.

तर शिरवळ जिमखाना अध्यक्ष डॉ.विजय शिंदे म्हणाले औद्योगिक नगरी शिरवळची ओळख क्रीडानगरी करण्यासाठी शिरवळ जिमखाना कटीबद्ध आहे. सर्व स्पर्धा चुरशीच्या व उत्साह पुर्ण झाल्या. या स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील मुलींमध्ये प्रथम दुर्वा पवार, द्वितीय मनस्वी माने व तृतीय फातिमा शेख यांनी तर मुलांमध्ये अर्णव कबुले, राज रोकडे व वेदांत जाधव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवत बाजी मारली. १७ वर्ष वयोगटात मुलींच्यात प्रथम दिया शरणागत, द्वितीय नेहल शिंदे व तृतीय क्रमांक अक्षरा तोडकर यांनी मिळवला तर मुलाच्यात श्रेयश गायकवाड, कौस्तुभ भावार्थाची व चिरायू जोशी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी समर्पण फौंडेशन व बॅडमिंटन कमिटी प्रभारी प्रताप भानुशाली, सदस्य रमेश चव्हाण, अमोल जराडे, कुणाल गायकवाड व जिमखाना सदस्य याचे विशेष सहकार्य लाभले.

# महाबळेश्वरच्या निवडणुकीचा निर्णय अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे; निवडणूक लांबणीवर

### कुमार शिंदे उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार; उमेदवार उपस्थित



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.३०, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर पालिका सार्वत्रिक निवडणुकी संदर्भात न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना देखील आपण उमेदवारांना चिन्ह वाटप करून बेकायदेशीर काम करत आहात, असे सांगून देखील अपुऱ्या माहितीच्या आधारे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन मस्के सहा निवडणूक निर्णय अधिकारी योगेश पाटील यांनी राजकीय दबावापोटी येत ही प्रक्रिया रेटत नेली, राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास ही चुकीची बाब आम्ही कळवली होती. अखेर नव्याने निवडणूक प्रक्रिया घेण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. चुकिचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे उमेदवारांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

या अधिकाऱ्यांविरोधात कोल्हापूर उच्च न्यायालयात आम्ही एक याचिका दाखल करणार असून नुकताच जिल्हा न्यायालयाने नगराध्यक्ष पदाच्या दोन उमेदवारांसह प्रभागातील काही उमेदवारां विरोधातील जी याचिका फेटाळली आहे. त्यावरही आम्ही पुन्हा उच्च न्यायालयात जात दाद मागणार असल्याची माहिती गिरिस्थान नगर विकास आघाडी (नियोजित) चे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार कुमार शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली यावेळी आघाडीचे सर्व उमेदवार उपस्थित होते.

दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजीरात्री उशिरा राज्य निवडणूक आयोगाने महाबळेश्वर येथील निवडणूक प्रक्रियेला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला होता. आता ही निवडणूक दि.२० डिसेंबर रोजी होणार असल्याचे जाहीर केले आहे. निवडणूक प्रक्रिया लांबणीवर पडल्यामुळे जनते मध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे या सर्व बाबींचा खुलासा करण्यासाठी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार कुमार शिंदे यांनी आज पत्रकार परिषद घेतली.

यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले, निवडणुकीला उभे असणारे नगराध्यक्ष पदाचे राष्ट्रवादीचे अधिकृत उमेदवार सुनील लक्ष्मण शिंदे, लोकमित्र जनसेवा आघाडीचे डी.एम बावळेकर यांनी नगरपालिकेचा जाहिरात कर बुडवला आहे. याचे गेल्या काही वर्षातील तारखेसह काढलेले फोटो व पुरावे देखील आम्ही सादर केले होते. नियमानुसार थकबाकी असणारे उमेदवार निवडणुकीला पात्र ठरत नाही. याबाबत पुरावे देखील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आले. परंतु राजकीय दबावापोटी नगरपालिकेने त्यांना तुटपुंजी रक्कम भरायला लावून उमेदवारांना थकबाकी नसल्याबाबतचे पावती दिली. परंतु या पावतीवर कोणताही जीएसटी चा उल्लेख देखील नाही. दंड व्याज आकारणी नमूद नाही. त्यामुळे जिल्हा न्यायालयात आम्ही याचिका दाखल केली होती. ही कायदेशीर प्रक्रिया सुरू असताना देखील निवडणूक निर्णय अधिकारी सचिन मस्के सहा निवडणूक निर्णय अधिकारी योगेश पाटील यांनी उमेदवारांना चिन्ह वाटप केले. बेकायदेशीर प्रक्रिया या अधिकाऱ्यांनी वापरल्याचे राज्य निवडणूक आयोगाला आम्ही कळवले होते. त्यांनी तात्काळ ही निवडणूक प्रक्रिया स्थगित केली आहे. आता दिनांक ०४ डिसेंबर २०२५ रोजी नव्याने निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार आहे. दि.१० डिसेंबर रोजी अर्ज मागे घेण्याची मुदत, दि.११ डिसेंबर रोजी आवश्यकतेनुसार निवडणूक चिन्ह वाटप व अंतिम उमेदवार यादी जाहीर करणे, दि.२० डिसेंबर रोजी मतदान दि.२१ डिसेंबर रोजी निकाल, असा हा नव्याने निवडणूक कार्यक्रम होणार असल्याचे कुमार शिंदे यांनी सांगितले यावेळी माजी नगराध्यक्ष स्वप्नाली शिंदे, राज मोहम्मद नालबंद,प्रियांका अजित बावळेकर,प्रशांत महादेव आखाडे, सोनाली रोहित बांदल हेमंत बाळकृष्ण साळवी, पूजा तुषार उतेकर विमल पांडुरंग बिरामणे प्रभा विजय नायडू प्रभाग नीता आकाश झाडे,राहुल अशोक भोसले, सलीम जब्बार बागवान, शबाना अल्ताफ मानकर, संगीता शामराव गोंदकर, संगीता प्रकाश हिरवे,मोअज्जम ताजुद्दीन नालबंद, सुनीता संदीप आखाडे आदी उमेदवार उपस्थित होते.

### उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार

सध्या अन्य ठिकाणी होत असणाऱ्या नगरपालिका निवडणुकांचा निकालाचा परिणाम हा महाबळेश्वरच्या निवडणुकीवर देखील होऊ शकतो. त्यामुळे त्यांचे निकाल राखून ठेवावेत असे पत्र राज्य निवडणूक आयोगाला देणार असल्याचे कुमार शिंदे यांनी सांगितले तसेच जिल्हा न्यायालयाने फेटाळलेली याचिकेचे अपील कोल्हापूर उच्च न्यायालय दाखल करणार व ज्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या चुकीच्या निर्णयामुळे उमेदवारांचे आर्थिक नुकसान झाले. त्यांच्या विरोधातील याचीका देखील कोल्हापूर उच्च न्यायालयात दाखल करणार असल्याचे सांगितले.

# पालकांनी मुलांना योग्य संस्कार देणे काळाची गरज!



आजकालची युवा पिढी संस्काराच्या अभावामुळे बिघडत असल्याचे चित्र आपण सर्वजण पाहत आहोत. मुलांना योग्य वयात योग्य संस्कार मिळत नसल्यामुळे मुले संस्कारहीन बनली आहेत. संस्काराच्या अभावामुळे मुले माणसासारखे न वागता कसेही गैरवर्तन करून माणुसकीला गालबोट लावत आहेत. शिक्षण शिकायचे सोडून शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जात आहेत.

माणसातील माणुसकीचे गुणधर्म लोप पावल्यामुळे देशात बलात्कार, व्याभिचार, अत्याचार, अनाचार व भ्रष्टाचार फोफावला आहे. रोज दिवसा ढवळ्या देशात महिलांवर व मुलींवर बलात्कार केले जात आहेत. लहान चिमुरडी असो अथवा वृद्ध म्हातारी असो बलात्कारी बलात्कार करून मोकळे होत आहेत. शासन देखील त्यांना कठोर शिक्षा देत नाही. दररोज वर्तमानपत्रात बलात्काराच्या बातम्या छापून येत आहेत. बलात्काराचे वाढते प्रमाण पाहून माणसाचे मन सुन्न होत आहे. एकेकाळी या देशात महिलांना व मुलींना खूप मान सन्मान दिला जायचा. महिलांकडे वाईट नजरेने बघायची कोणाची हिंमत व्हायची नाही. दुसऱ्यांच्या मुलीला बहीण व दुसऱ्याच्या आईला आई मानणारी माणसे आता अस्तित्वात राहिली नाहीत. हल्ली माणसांवर योग्य संस्काराची पेरणी न केल्यामुळे मुले व मुली मनात आले तसे वर्तन करून आई-वडिलांचे नाव खराब करत आहेत. खरेतर मुले लहानाची मोठी होताना मुलांना योग्य संस्काराच्या छायेखाली लहानाची मोठी करणे प्रत्येक आई-वडिलांचे परम कर्तव्य असते. परंतु आजकाल कोणतेच आई-वडील आपल्या मुलांवर योग्य संस्काराची पेरणी करत नाहीत. मुलांना अतिलाडात वाढवतात आणि त्यांना कसेही मोकाट जनावरासारखे हिंडू देतात. मुलांचा अतिलाड केल्यामुळे मुले आई-वडिलांना घाबरत नाहीत.

आई वडिलांचा मान सन्मान करत नाहीत. आई वडिलांना घाण घाण शिव्या देतात, सार्वजनिक ठिकाणी त्यांचा अपमान करतात आणि म्हातारपणात त्यांना वृद्धाश्रमात पाठवतात. दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, संस्काराच्या अभावामुळे मुले शैक्षणिक प्रवाहाच्या बाहेर जाऊन कुठेही भरकटत जात आहेत. आज जर देशात पाहिले तर कित्येक मुले संस्कारा अभावी व शिक्षणा अभावी विनाशाच्या उंबरठ्यावर उभी आहेत. देशात बलात्काराचे प्रमाण वाढणे, व्यसनाचे प्रमाण वाढणे, आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवणे, ज्येष्ठांचा अनादर करणे, महिलांकडे वाईट नजरेने पाहणे किंवा पत्नीवर संशय घेणे हे केवळ आणि केवळ माणसाला संस्कार योग्य वेळी न भेटल्यामुळे असे प्रकार घडत आहेत. शिक्षण व्यवस्था सुद्धा म्हणावी तेवढी प्रबळ व सशक्त राहिली नाही. बऱ्याच शाळेतील शिक्षक व्यसन करूनच विद्यार्थ्यांना अध्यापन करतात. गुटखा, तंबाखू व सिगारेट शाळेत ओढतात. काही शिक्षक तर विद्यार्थ्यांना तंबाखू मागून घेतात आणि विद्यार्थी सुद्धा शिक्षकांना तंबाखू मागून घेऊन खातात. मग तुम्हीच सांगा मित्रांनो विद्यार्थ्यांनी आदर्श कोणाचा घ्यायचा? अशा वागण्यामुळे गुरु शिष्याच्या नात्यातील पावित्र्य कलंकित होत आहे. आई-वडिलांच्या नंतर जर कोणी विद्यार्थ्यांवर संस्काराची रुजवण करत असेल तर ते शिक्षक करत असतात. परंतु हल्ली हेच शिक्षक आज व्यसनी, आळशी, कामचुकार, कर्तव्यहीन आणि टंगळमंगळ करणारे झाले आहेत.

विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून संस्काराची योग्य रुजवण होत नसल्यामुळे विद्यार्थी सुद्धा दिशाहीन व व्यसनाधीन बनत चालली आहेत. त्यांना आवर घालणारे कोणीच राहिले नाही. आई-वडिलांचा अतिलाड, त्यात मोबाईलचे व्यसन आणि मोबाईल मध्ये नको ते व्हिडिओ पाहून विद्यार्थी वाममार्गाला लागत आहेत. स्वतःच्या हाताने स्वतःचे नुकसान करून घेत आहेत. विद्यार्थी असे वागण्याला केवळ आणि केवळ त्यांचे आई-वडीलच कारणीभूत आहेत. कारण आई-वडिलांनी त्यांना योग्य वयात योग्य संस्काराची रुजवण न केल्यामुळे विद्यार्थी संस्कारहीन व अविचारी बनत आहेत.

श्यामची आई हे पुस्तक वाचताना श्यामच्या आईने श्यामवर संस्काराची कशी रुजवण केली आणि श्यामचे जीवन कसे घडत गेले हे आपल्याला त्या पुस्तकात वाचायला मिळते. राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवरायांवर स्वच्छ व नितळ सुविचारांची व संस्काराची पेरणी करून छत्रपती शिवरायांना आदर्श राजे म्हणून घडवले.

छत्रपती शिवरायांच्या शिवशाहीत कोणत्याच पुरुषाची कोणत्याच स्त्रीकडे वाईट नजरेने बघायची हिंमत होत नव्हती. छत्रपती शिवरायांनी परस्त्रीला मातेसमान मानले. राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवरायांवर योग्य वयात योग्य संस्कार केल्यामुळेच छत्रपती शिवरायांनी स्वराज्य निर्माण केले. आपण विचार करून बघा की, ज्या आई-वडिलांनी आपल्या मुलांवर योग्य संस्कार टाकलेत, ती मुले आई-वडिलांना एकटे सोडून कधीच राहत नाहीत. शेवटपर्यंत आई-वडिलांना जीवापाड सांभाळतात आणि त्यांना आपले दैवत मानतात. आई-वडिलांच्या संस्काराच्या छायेखाली लहानाची मोठी झालेली मुले कधीच वाममार्गाला जात नाहीत. खूप खूप अभ्यास करून व मनात मोठी जिद्द ठेवून यशोशिखर गाठतात. आपल्यापेक्षा वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवतात. आई-वडिलांना कधीच शिवीगाळ करत नाहीत किंवा त्यांना अपशब्द वापरत नाहीत. म्हणून पालकांनी आपल्या मुलांना योग्य वयात योग्य संस्कार देऊन त्याला चांगला नागरिक बनवणे आपले परम कर्तव्य आहे. बालवयात मुलांवर संस्कार केले तर ते कायमस्वरूपी टिकतात.

बालपणी मुलाचे मन मेणासारखे मऊ असते त्याला आपण जसा आकार देऊ तसे ते घडत जाते. म्हणून प्रत्येक आई-वडिलांना माझी कळकळीची नम्र प्रार्थना आहे की, पालकांनो आपल्या मुलांना अगोदर संस्काराची रुजवण करून चांगला नागरिक बनवा. त्याला आपल्या धाकात ठेवा. तो रोज काय करतो व त्याचे मित्र कोण आहेत? याची खात्री करून त्यांच्यावर रोज पाळत ठेवा. तुम्हाला जर म्हातारपणात मुलाने आधार द्यावा आणि शेवटपर्यंत आपल्याला त्याने साथ द्यावी असे जर वाटत असेल तर पालकांनो आपले कर्तव्य आहे की, अगोदर आपल्या मुलांवर चांगल्या व स्वच्छ संस्काराची पेरणी करून त्याला आदर्श नागरिक घडवा, मग पहा तुमचा मुलगा तुमच्या पासून दूर कधीच जाणार नाही आणि या दुनियेतील लोकांसोबत कधीच वाईट व्यवहार करणार नाही माणसासारखे वागून व माणसासारखे वर्तन करून माणूस असल्याचे उत्तम उदाहरण जगाला दाखवून देईल. त्यासाठी फक्त गरज आहे ती पालकांनी मुलांना योग्य संस्कार देण्याची...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# राजेश अग्रवाल यांनी मुख्य सचिव पदाचा पदभार स्वीकारला

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, मुंबई :** मावळते मुख्य सचिव राजेश कुमार यांच्याकडून नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज पदभार स्वीकारला. शासनाने राज्याच्या मुख्य सचिव पदावर अग्रवाल यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित केले होते. मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा वर्मा, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव (अ.व.सु) राधिका रस्तोगी, मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद-सिंगल, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकज कुमार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव राम स्वामी एन, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, मुंबई म हानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांच्यासह मुख्य सचिव कार्यालय व अन्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. महाराष्ट्राचा विकास आणि गौरव वाढविण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत राहीन असे मुख्य सचिव पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर अग्रवाल म्हणाले.

**राजेश अग्रवाल यांचा अल्प परिचय –**

राजेश अग्रवाल हे भारतीय प्रशासकीय सेवेतील महाराष्ट्र कॅडरचे १९८९ चे अधिकारी असून त्यांचे मूळ गाव पंजाबमधील जालंधर हे आहे. त्यांनी कॉम्प्युटर सिस्टिम विषयामध्ये बी.टेक केले आहे. आपल्या सेवाकाळात त्यांनी सहायक जिल्हाधिकारी रत्नागिरी, जिल्हा



परिषद जळगाव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला येथे जिल्हाधिकारी, महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथे उप विशेष आयुक्त, केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, भारत निवडणूक आयुक्त कार्यालयात संचालक, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागाचे सचिव, इंटर्नल एक्स्चेंज ऑफ इंडिया नवी दिल्ली येथे राष्ट्रीय अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, मंत्रालय मुंबई येथे कृषी, मत्स्यव्यवसाय विभागात सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागात सचिव (अतिरिक्त कार्यभार), वित्त विभागात सचिव, सामान्य प्रशासन विभागात प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), वित्त विभागात लेखा व कोषागारे विभागात सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार, वित्त विभागात सचिव (लेखा व कोषागारे) (व्यय – अतिरिक्त कार्यभार), केंद्र सरकारच्या वित्त सेवा विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या आदिवासी विकास विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागाचे महासंचालक (प्रशिक्षण), पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस विभागात अतिरिक्त सचिव आणि वित्त सल्लागार, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागात सचिव, केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागात सचिव, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागात अतिरिक्त मुख्य सचिव अशा विविध पदांवर काम केले आहे.

# डिजीटल मीटर हटविण्यावर एकमत; खिर्डी ग्रामपंचायतचा ठराव पारित

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** डिजीटल विजमीटरमुळे अवास्तव आणि वाढीव विद्युत बील आकेरले जात असल्याच्या तक्रारीवरुन चंद्रपूर जिल्ह्यातील खिर्डी ग्रामपंचायतने एकमताने ठराव पारित केला. डिजीटल मीटर हटवून जुने मीटर लावण्यासाठी हा ठराव घेण्यात आला. डिजीटल मीटर बसविल्यापासून अचानक वीज बिलात मोठी वाढ झाली आहे. काही घरांचे बील सरळ दुप्पट झाले, तर काहींचे बील तीन पट वाढल्याने ग्रामसभेत तीव्र नाराजी उसळली.

वाढलेल्या आर्थिक भारामुळे डिजीटल म ीटरविरोधात तीव्र भावना व्यक्त होत गेल्या आणि शेवटी डिजीटल मीटर तात्काळ हटवून जुन्या पध्दतीचे मीटर पुन्हा बसविण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

हा महत्वपूर्ण ठराव ग्रामपंचायत सरपंच शामराव सलाम यांच्या अध्यक्षतेखाली तर उपसरपंच दिपक खेकारे यांच्या उपस्थितीत मांडण्यात आला. गावकरी, पदाधिकारी व सदस्यांच्या उपस्थितीत ठरावाला एकम ुखी मंजुरी मिळाली. खिर्डी ही जिल्ह्यातील पहिली ग्राम पंचायत ठरली आहे. ज्यांनी अधिकृतरित्या डिजीटल मीटर हटविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या ठरावाकडे जिल्हा तसेच राज्यातील इतर ग्रामपंचायतीचे लक्ष वेधले गेले आहे. तसेच गावकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (म.रा.वि.म.) कार्यालय, गडचांदूर येथे तातडीने निवेदन देऊन डिजीटल मीटर काढून जुन्या मीटरची पुनर्बांधणी करण्याची मागणी केली. निवेदनासोबत ग्रामसभेचा ठराव, निर्णय व वाढीव बिलांची उदाहरणेही अधिकाऱ्यांना सादर करण्यात आली.

यावेळी उपसरपंच दिपक खेकारे, अनुसया कोटनाके, नितेश धानोरकर, रवींद्र मुक्के, सुभाष वायकोर, सतीश राखुंडे, प्रशांत हिवरकर, बबन फड, भाऊराव ठाकरे, नामदेव झगझप आदींची उपस्थिती होती. जर एक महिन्याच्या आत डिजीटल मीटर हटवून जुन्या म ीटरची बसवणी करण्यात आली नाही, तर आम्ही स्वत: मीटर काढून महावितरण कार्यालयात ठेवू. तसेच पुढील ग्रामसभेत कठोर निर्णय घेतला जाईल, असा इशारा गावकऱ्यांनी यावेळी दिला.

# मालमत्ताकराचा तात्काळ भरा; अन्यथा होणार कारवाई!

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, नवी मुंबई :** म हानगरपालिकेच्या मालमत्ताकर विभागाकडून थकबाकीदारांविरुद्ध जप्तीपूर्व नोटीस बजावण्यास सुरुवात झाली आहे. एकूण थकबाकीदारांपैकी आतापर्यंत ६४५ नागरिकांना ७ दिवसांची जप्तीपूर्व नोटीस बजावण्यात आली आहे. तर २१८ नागरिकांना ४८ तासांची जप्तीपूर्व नोटीस बजावण्यात आली आहे. थकबाकीदारांना तातडीने कर न भरल्यास पुढील टप्प्यात महानगरपालिकेकडून प्रत्यक्ष जप्ती कारवाईला सुरुवात करण्यात येणार आहे.मालमत्ताकर हा महानगरपालिकेच्या महसूलाचा सर्वात महत्वाचा स्त्रोत




असून यातूनच नागरिकांना विविध सेवा सुविधांची पूर्तता केली जाते. त्यामुळे कर भरण्याबाबत सातत्य नसल्यास त्याचा शहरातील विकासकामांवर परिणाम होतो. त्या अनुषंगाने थकबाकीदारांना दिलेली जप्तीपूर्व नोटीस ही नागरिकांना दिलेली अंतिम सूचना आहे. जप्तीसारख्या कठोर कारवाया टाळण्यासाठी नागरिकांनी वेळेत करभरणा करावी, असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांचेमार्फत करण्यात आलेले आहे. सुलभ व सहज कर भरणा करण्यासाठी सर्व प्रकारच्या ऑनलाईन सुविधा उपलब्धनागरिकांना करभरणा करण्यासाठी कोणत्याही महानगरपालिका कार्यालयात जावे न लागता घरबसल्या ऑनलाईन सुविधा उपलब्ध व्हाव्यात. यादृष्टीने मालमत्ताकर विभागाने सर्व डिजिटल पेमेंट पद्धती उपलब्ध करून दिल्या असून त्याचा प्रचार आणि प्रसार प्रभावीपणे केला आहे. व्हॉट्सॲप चॅटबॉट (८२९१९२०५०४), चू छचचउ (माझी नवी मुंबई ) ॲपु.पाल.सीं.ळपही महानगरपालिकेची अधिकृत वेबसाईट, तसेच प्रत्येक कर देयक वरील क्यूआर कोड स्कॅनिंग त्याचप्रमाणे फोनपे, जीपे अशा विविध युपीआय माध्यमांद्वारे पेमेंट करण्याच्या ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तरी मालमत्ताकर धारकांनी याचा लाभ घेऊन त्वरित करभरणा करावी आणि कटू कारवाई टाळावी असे आवाहन करण्यात येत आहे.

# कार्यकर्ता ते नेता होण्याच्या निवडणुका...

सध्या महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थात नगरपंचायत निवडणुका जाहीर झाल्या आहेत. पुढील दोन ते तीन महिन्यांत जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच महानगरपालिकांच्या देखील निवडणुका होणार आहेत. साधारणपणे या निवडणुका कार्यकर्त्यांच्या निवडणुका म्हणून ओळखल्या जातात. तरीदेखील घराणेशाहीमुळे तळागाळातून प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळवताना अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते.

१९५० च्या मूळ राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वातील कलम ४० मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, राज्याने ग्रामपंचायती स्थापन करून त्या स्वराज्य संस्था म्हणून कार्य करू शकतील आणि इतर आवश्यक अधिकार त्यांना द्यावेत. १९५० च्या दशकात देशातील विविध भागांत पंचायत राज संस्था अस्तित्वात आल्या आणि त्या कमीअधिक कार्यक्षमतेने कार्य करत राहिल्या. राजीव गांधी पंतप्रधान असताना स्थानिक स्वराज्य संस्थांची घटनात्मक हमी असावी, असे सरकारला वाटू लागले. त्यातून १९९२ मध्ये ७३वी आणि ७४वी घटनादुरुस्ती करून संबंधित कलमे संविधानाच्या ९वा आणि ९अ भागात समाविष्ट करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांविषयी घटनात्मक तरतूद असलेला भारत हा जगातील एकमेव देश आहे. ग्रामीण आणि शहरी भागांसाठी असलेल्या या संस्था म्हणजे लोकशाहीची पाठशाळा असून सत्तेच्या विकेंद्रिकरणासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या निवडणुकांमध्ये यशस्वी होण्यासाठी साम-दाम-दंड-भेद ही तंत्रे वापरली जातात; परंतु याहीपेक्षा पुढे जाऊन एखाद्या कार्यकर्त्याचे जनतेशी असलेले निःस्वार्थ नाते त्याला सहज विजय मिळवून देते. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना उभारताना ८०% समाजकारण आणि २०% राजकारण हा फॉर्म्युला दिला. या सूत्राचा वापर करून अनेक कार्यकर्त्यांनी समाजोपयोगी कामे केली. त्यांच्या शाखांमधून सामान्यांच्या अडचणी दूर केल्या जात असत. साडेचार वर्षे समाजकारण आणि फक्त दोन-तीन महिने निवडणुकीपुरते राजकारण करणारा हा पक्ष अल्पावधीत महाराष्ट्रातील प्रमुख पक्ष बनला आणि १९९५ मध्ये सत्तेवरही आला.

आज, मात्र, हा फॉर्म्युला अनेक पक्ष विसरले आहेत. एकमेकांवर झरी टीका करणे, द्वेषमूलक वक्तव्ये करणेयातून केवळ न्यूज चॅनेल्सचा टीआरपी वाढतो. काम कमी आणि बोलणं जास्त, शिव्या कढीला ऊत आणण्यासारखे प्रकार स्थानिक पातळीपासून ते राज्यपातळीपर्यंत राजकारणात दिसून येतात. लोकशाहीमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, आपले मत आणि विचार मांडण्याचे व प्रचार करण्याचेही स्वातंत्र्य आहे. वाद-विवादातून विचारांची लढाई लढण्याचेही स्वातंत्र्य आहे. अमेरिकेत राष्ट्रपती पदाचे उमेदवार प्रसारमाध्यमांसमोर थेट वादविवाद करतात. त्यांच्या बोलण्यातून त्यांचा आत्मविश्वास, कामाची तळमळ आणि विचारांचा गाभा दिसून येतो. सुज्ञ नागरिक ज्याचे व्यक्तिमत्त्व जास्त प्रभावी वाटते त्यालाच निवडतात.परंतु केवळ विचारांची लढाई पुरेशी नसते. धोरणात्मक निर्णय घेण्याची क्षमता आणि ती धोरणे राबवण्याची कुवत ज्याच्यात असते तोच खऱ्या अर्थाने लोकांच्या पसंतीस पडतो.

स्थानिक स्वराज्य संस्थांपासून राजकीय प्रवासाची सुरुवात करून मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचलेल्या स्वर्गीय विलासराव देशमुख आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याचे अभ्यासपूर्ण चिंतन कार्यकर्त्यांनी करायला हवे. खणखणीत नाणे कुठेही चालते या म्हणीप्रमाणे आपले काम हेच आपली खरी ओळख असते. आज एखादा कार्यकर्ता कोणत्याही पक्षापुढे तिकीट मागण्यासाठी जातो, तेव्हा दोन प्रश्न विचारले जातात:या निवडणुकीत किती खर्च करणार? तुझ्या मागे तुझा सम ाज किती आहे? जो कार्यकर्ता या दोन प्रश्नांच्या चौकटीपलीकडे जाऊन काम करतो, तोच विलासराव देशमुख आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा लांबचा राजकीय पल्ला गाठू शकतो. प्रत्येक कार्यकर्त्याने स्वतःला काही प्रश्न विचारायला हवेतमाझे व्यक्तिमत्त्व खरोखरच जनसेवेस पात्र आहे का? संयम आणि सहनशीलता माझ्यात किती आहे? सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन काम करण्याची क्षमता माझ्यात आहे का? या सर्वांचा विचार करूनच कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या राजकारणात उतरावे. कार्यकर्ता ते नेता होण्याच्या या निवडणुकातून महाराष्ट्राला पुरोगामी, विकासाभिमुख, दूरदृष्टी असणारे आणि सहिष्णू वृत्तीचे नेतृत्व मिळेल हीच अपेक्षा...

**किशोर जाधव, सोलापूर, मो.नं. ९९२२८८२५४१**

# थोडक्यात

## सायबर गुन्हेगाराला कर्नाटकातून अटक; कुरियर बॉयची झाली मदत




**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.३०, सोलापूर :** आमचे केवायसी करायचे आहे. तुमचे बँक खाते लगेच बंद होईल, तुमचे खाते ब्लॉक झाले आहे. तुमच्या गाडीवर दंड आहे, तो भरा, लिंकवर क्लिक केल्यास लगेच खात्यात पैसे जमा होतील, लिंक शेअर करा आणि पैसे मिळवा असे एक ना अनेक कारणे सांगून सायबर ठग लोकांना आपल्या जाळ्यात ओढतात. त्यांच्या कष्टाची कमाई काही मिनिटात पळवतात. अशाच प्रकारे जिल्ह्यातील गोपीचंद (बदललेले नाव) तुमचे पार्सल रिटर्न होईल असे सांगून त्याच्या खात्यातून ९० हजार रुपये दुसऱ्या खात्यात वळवले. सायबर पोलिसांना याची माहिती मिळताच त्यांनी आरोपींचा शोध घेत कुरियर बॉयचा सहकारी बनून जामतारा येथील ठगाला कर्नाटकातून अटक केली. विषेश म्हणजे या चोरांनी त्या पैशातून 'गोल्डचे क्वाईन' खरेदी केल होते.

जिल्ह्यातील गोपीचंद यांनी ऑनलाइन साईटवरून एक वस्तू खरेदी केली होती. त्या वस्तूच्या डिलिव्हरीसाठी त्यांनी सर्च करून संबंधित कंपनीशी संपर्क केला. पण तो संपर्क कंपनीला न होता या ठगापर्यंत पोहोचला. यामुळे सायबर ठगांनी तुमचे पार्सल परत जाईल असे सांगून, ओटीपी घेत खात्यातील ९० हजार रुपये पळवले. यामुळे कष्टाचे पैसे गेल्याने रडत रडत गोपीचंद यांनी ग्रामीण सायबर पोलिस ठाणे गाठले. तक्रार दाखल होताच सायबरचे पोलिस उपनिरीक्षक अमितकुमार करपे यांनी ते पैसे कोणत्या खात्यात गेले याची माहिती मिळवली. त्यानंतर त्या पैशातून सोन्याचे क्वाईन खरेदी केल्याची माहिती मिळताच पोलिसांना ही धक्का बसला. त्यामुळे पोलिसांनी संबंधित कुरिअर कंपनीला संपर्क केला. तेव्हा त्या पैशातून खरेदी केलेले गोल्ड क्वाईन संबंधिताला दिल्याची माहिती कळाली. पण, आणखी काही इतर ऑर्डर तेथे जाणार असल्याचे कळाल्यानंतर पोलिसांनी डिलिव्हरी बॉयचा सहकारी असल्याचे भासवून आरोपीला तेथून पकडले. पकडलेला हुशारचंद (बदललेले नाव) हा मूळ झारखंडमधील जामतारा येथील. पण तो एजंट म्हणून कर्नाटकातील कोलार येथे काम करत होता. त्याच्या इतर साथीदारांचा शोध घेण्यात येत आहे.

## सुपा पंचक्रोशी म्हणजे बिबट्यांचे माहेरघरच



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.३०, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील सुपा पंचक्रोशीतील पिंपरी गवळी येथील वडाचा दरा येथे दि.१५ नोहेंबर २०२५ रोजी एक बिबट्या वनविगाच्या पिंजर्यामुळे धरला आणि दि.३० नोहेंबर २०२५ रोजी परत एक बिबट्या जेरबंद करण्यात आला. तेथे ही वनविभागाला यश आले, तरी ह्या परिसरात लहान - लहान बिबट्यांचा वावर आज ही दिवसा, रात्री पहावयास मिळतो. ५ दिवसापुर्वी पिंपरी गवळी येथील शेतकरी रामदास थोरात यांच्या वर बिबट्याने हाल्ला केला होता ते बालंबाल बचावले. त्याच रात्री परीसरातील शेतकरी भाणुदास भोरात यांच्या गायीवर बिबट्याने हल्ला केला होता. दुसरे दिवशी अविनाष बादल यांच्या शेळ्यावरती बिबट्याने हल्ला केला. रात्रीच्या वेळी बाळासाहेब मांडगे यांच्या गायी गोठ्यावर बिबट्याने हल्ला केला होता. असे अनेक प्रकार सुपा पंचक्रोशीतील गावावर होत आहे. सुपा पंचक्रोशी म्हणजे बिबट्यांचा हाट स्पॉट झाला आहे, असे अनेक लहान मोठे बिबटे परीसरात दररोज नजरेस पडतात. परिसरात काही अनुचित प्रकार घडु नये. म्हणून बिबट्यांचा बंदोबस्त होणे गरजेचे आहे. असे पिंपरी गवळी येथील प्रगतशिल शेतकरी राजुशेट थोरात, भाउसाहेब थोरात, प्रदीप थोरात, धनंजय गवळी, अरुण थोरात, विश्वनाथ मांडगे, अनिल थोरात, विरेंद्र थोरात, विरेंद्र गवळी, विकास थोरात, केशव थोरात, संदीप थोरात, सुनिल थोरात, पंडीत थोरात, नवनाथ रणशिंग, दत्ताथोरात यांनी सांगितले.

## वाघोलीत ११ लाखांचा एम.डी.जप्त; कोरेगाव पार्कमध्येही अंमली जाळे बोकाळले

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**




**दि.३०,वाघोली (पुणे) :** वाघोली परिसरात अंमली पदार्थ विरोधी पथक ०२, गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी ११,१०,००० रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन (एम.डी.) जप्त करत मोठी कारवाई केली. आरोपी लेखाराम चौधरी (रा. जोधपूर) याला पथकाने मंथन कॉम्प्लेक्स परिसरातून पकडले. दरम्यान, येरवडा, कोरेगाव पार्क परिसरातही अंमली पदार्थांचे जाळे जलद गतीने पसरत असल्याचे समोर आले. काही आठवड्यांपूर्वी या भागातही अशाच प्रकारची कारवाई नारकोटिक्स टीमने केली होती. नार्को पथक जितक्या धडाडीने ऑपरेशन करत आहे. तितकीच सक्रियता स्थानिक पोलीस ठाण्यांनी विशेषतः कोरेगाव पार्क, येरवडा, विमान नगर दाखवत नाहीत. अशी जोरदार टीका नागरिकांकडून होत आहे.

## कृषी महाविद्यालयात 'भूजल व्यवस्थापन आणि कृत्रिम पुनर्भरण' विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.३०, धाराशिव :** केंद्रीय भूजल बोर्ड, राज्य एकक कार्यालय पुणे यांच्या वतीने २७ नोव्हेंबर रोजी धाराशिव येथील तेर रोडवरील कृषी महाविद्यालयात भूजल व्यवस्थापन आणि कृत्रिम पुनर्भरण या विषयावर एकदिवसीय टियर-III प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ति किरण एस. पुजार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विशेष मान्यवर अतिथी म्हणून कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब बडगिरे, मराठवाडा विद्यापीठ उपपरिसराचे भूमी आणि जल व्यवस्थापन विभागप्रमुख प्रा. नितीन पाटील तर अध्यक्षस्थानी भूजल बोर्डाचे क्षेत्रीय निदेशक डॉ.उमेश बालपांडे हे उपस्थित होते. या प्रसंगी कृत्रिम पुनर्भरण पद्धतींवर एक पुस्तिका प्रकाशित करण्यात आली. तांत्रिक सत्रांमध्ये केंद्रीय भूजल बोर्ड, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा आणि कृषी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी केंद्रीय मार्गदर्शक तत्त्वांनुसार सर्व महत्त्वाच्या भूजल विषयांचा आढावा घेतला. राज्य शासन कर्मचारी, कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, स्वयंसहायता गटातील महिला, उमेदच्या सदस्य, शेतकरी यांनी सक्रिय सहभाग घेतला. सर्व सहभागींनी केंद्रीय भूजल बोर्डाच्या भूजल व्यवस्थापन संदर्भात जल साक्षरता उपक्रमांबाबतच्या प्रयत्नांचे कौतुक केले. एकूण १३४ सहभागी या कार्यशाळेत उपस्थित होते.